लोकमत पा. नं. ५.

# पतीला २७ हजार पगार, गृहिणीच्या बँक खात्यात २० कोटींची उलाढाल

## ‘प्राप्तिकर’ची नोटीस; पॅन कार्ड घेत फसवणूक झाल्याचा महिलेचा दावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** पतीला २७ हजार रुपये पगार, गृहकर्जाचे हप्ते भरणाऱ्या गृहिणीला प्राप्तिकर विभागाने दोन बँक खात्यांतून २० कोटींपेक्षा जास्त रुपयांची उलाढाल केल्याबाबत नोटीस पाठविली आहे. या प्रकरणी तिने पॅन कार्डचा गैरवापर करून बनावट खाती उघडून फसवणूक झाल्याची तक्रार भाईंदर पोलिसांसह प्राप्तिकर विभाग, रिझर्व्ह बँकेकडे केली आहे.

भाईंदर पश्चिमेस क्रॉस गार्डनजवळील फेरो कॉम्प्लेक्समध्ये आशा जैन या पती देविचंद व दोन मुलांसह राहतात. त्यांना २९ मार्चला प्राप्तिकर विभागाने नोटीस पाठविली आहे. त्यात सिद्धी इंटरप्रायझेस



भाईंदरच्या आयसीआयसीआय बँक शाखेतून सहा कोटी ३७ लाख ९१ हजार, तर मीरा रोडच्या डीसीबी बँक शाखेतून १४ कोटी तीन लाख १६ हजारांचे व्यवहार २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात झाल्याबद्दल स्पष्टीकरण सादर करण्याची नोटीस बजावली आहे. विशेष म्हणजे, जैन यांच्या नावे त्या वर्षाचा एक लाख ५४ हजार इतका प्राप्तिकरही भरण्यात आला आहे. या प्रकाराने त्यांना मानसिक धक्का बसला आहे.

आर्थिक स्थिती बेताची असल्याने, दोन मुलांच्या शिक्षणासाठी आणि घरात किराणा खरेदीसाठी काही संस्थांच्या मदतीवर आपण अवलंबून आहोत. खाद्यपदार्थ बनवून विक्रीचा व्यवसाय असून, गौतम भन्साळी नामक परिचित व्यक्तीने भागीदारीत व्यवसाय सुरू करण्याची गळ घातली. पॅन कार्ड घेऊन सिद्धी इंटरप्रायझेस नावाने बँक खाते उघडले होते. हा प्रकार लक्षात आल्यानंतर ते खाते पत्र देऊन बंद केले होते. प्राप्तिकर विभागाची नोटीस आल्यानंतर, आयसीआयसीआय व डीसीबी बँकेत सिद्धी इंटरप्रायझेस नावाने बनावट खाती उघडून कोट्यवधींचे व्यवहार केल्याचे आढळले आहे.

### धमकावले जात असल्याचा आरोप

- गौतम याला जाब विचारला असता, आता तो धमकावत आहे.
- या प्रकरणी गौतमसह अन्य काही लोकांची नावे देऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी भाईंदर पोलिसांकडे लेखी तक्रारीद्वारे केल्याचे जैन यांनी सांगितले.
- काळा पैसा हा पांढरा करण्यासह सरकारचा कर बुडविण्यासाठी संगनमताने हा घोटाळा केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.
- बँकेत खाते उघडताना, मोबाइल क्रमांक, घरचा पत्ता गौतम याचाच असल्याचे आढळले. व्यवहारांची माहिती मिळू शकली नसल्याचे जैन यांचे म्हणणे आहे.



# अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**नालासोपारा :** विरार येथे अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. परिसरात राहणाऱ्या १५ वर्षीय मुलीवर परिसरातील आरोपी २६ जानेवारीपासून रस्त्यावरून जाताना पाळत ठेवून पाठलाग करत होता. शनिवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास पीडित मुलगी कामानिमित्त जात असताना आरोपीने तिला रस्त्यात थांबवून तिचा विनयभंग केला.

# परदेशी नागरिकांना फसवण्याचे रॅकेट

## बोगस कॉल सेंटरवर छापा; परराज्यातील ५० तरुणांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** राजोडीच्या समुद्रकिनारी असलेल्या एका फार्म हाऊसमध्ये थाटलेल्या बोगस कॉल सेंटरवर अर्नाळा पोलिसांनी रविवारी पहाटे छापा टाकून कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी कॉल सेंटर चालविणाऱ्या, त्यांना मदत करणाऱ्या व जागा मालक अशा ५३ जणांवर गुन्हा दाखल करून १३ तरुणी व ३७ तरुणांना अटक केली आहे. हे सर्व दिल्ली, पंजाब, हरयाणा राज्यातील असून उच्च शिक्षित आहेत. अर्नाळा पोलिस पुढील गुन्ह्याचा तपास करत आहेत.

ऑस्ट्रेलियातील पे पाल बँकेच्या खातेदारांचे पैसे इंटरनेट कॉलच्या माध्यमातून लुटण्याचे काम या बोगस कॉल सेंटरमधून केले जात होते. हे कॉल सेंटर मागील दीड महिन्यापासून सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. वसईच्या समुद्र किनाऱ्यावर अनेक रिसॉर्ट आहेत. अशातच राजोडी येथील एका रिसॉर्टमध्ये एक बोगस कॉल सेंटर सुरू असल्याची माहिती अर्नाळा पोलिसांना मिळाली होती. शनिवारी मध्यरात्री पोलिसांनी रिसॉर्टवर छापा मारला. यावेळी बोगस कॉल सेंटर सुरू असल्याचे आढळले.



### दिवसभर कारवाई

रविवारी दिवसभर ही कारवाई सुरू होती. ऑस्ट्रेलियाच्या पे पाल या बँकेच्या ग्राहकांचे पैसे परस्पर वळवून त्यांची आर्थिक फसवणूक केली जात होती. अटक केलेल्या आरोपींकडून २० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती अर्नाळा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कल्याणराव कर्पे यांनी ‘लोकमत’ला दिली आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता ५ा - नो - ११.

# विरारमधील 'रिसॉर्ट'मध्ये बोगस कॉल सेंटर

## ऑस्ट्रेलियातील बँकेच्या फसवणूकप्रकरणी ५३ जणांना अटक

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई :** विरारमधील राजोडी समुद्रकिनाऱ्यावरील एका रिसॉर्टमध्ये सुरू असलेले एक बोगस कॉल सेंटर अर्नाळा सागरी पोलिसांनी उघडकीस आणले. कॉल सेंटरद्वारे ऑस्ट्रेलियातील बँकेची फसवणूक करण्यात येत होती. याप्रकरणी ५३ जणांना अटक करण्यात आली आहे.

राजोडी येथील एका रिसॉर्टमध्ये बोगस कॉल सेंटर सुरू असल्याची माहिती अर्नाळा सागरी पोलिसांना मिळाली होती. या आधारे शनिवारी मध्यरात्री पोलिसांनी रिसॉर्टवर छापा टाकला. ही कारवाई रविवार पहाटेपर्यंत सुरू होती.

कॉल सेंटरमधून ऑस्ट्रेलियातील 'पे पाल' या बँकेच्या ग्राहकांची आर्थिक फसवणूक करण्यात येत होती, असे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी ५३ जणांना अटक केली असून यामध्ये १३ तरुणी आणि रिसॉर्ट मालकाचा समावेश आहे. गेल्या महिन्यापासून हे कॉल सेंटर सुरू होते.

सर्व आरोपी उच्चशिक्षित असून दिल्ली, हरयाणा, पंजाब येथील आहेत. त्यांच्याकडून २० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कल्याणराव करपे यांनी दिली.

लोकसत्ता ५ - ५ा - १.

# मशिदीजवळ घोषणा देणाऱ्या तिघांना जामीन

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** मीरारोडच्या नयानगरमधील शम्स मस्जिदजवळ शुक्रवारी पहाटे गाडीतून येऊन घोषणा दिल्याप्रकरणी अटक केलेल्या तीन तरुणांना ठाणे न्यायालयाने शनिवारी आधी न्यायालयीन कोठडीचा आदेश देत नंतर त्यांना जामीन अर्ज मंजूर केला आहे.

शुक्रवारच्या घटनेतील एक आरोपी राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी सेलचा मीरा-भाईंदर अध्यक्ष आहे. गुरुवारी राजमुद्रा असलेले भगवे झेंडे तरुणांनी लावल्याने ते मनसेशी संबंधित असल्याची शक्यता आहे.

शुक्रवारच्या शम्स घटनेत ओमकार धाकतोडे, क्रिस्टीन शेट्टी, जेसल साळोखे यांना अटक केली. ओमकार हा मीरा-भाईंदर राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी सेलचा जिल्हाध्यक्ष आहे. त्याची आई संगीता धाकतोडे या भाजपत आहेत.

### 'मनसेचा संबंध नाही'

गुरुवारी मोहम्मदी मशिदीजवळ नमाजदरम्यान दुवाकीहून आलेल्या सहाजणांनी झेंडे फडकावत घोषणा दिल्या होत्या. त्यातले भगवे झेंडे हे राजमुद्रा असलेले होते. त्यातील एक अल्पवयीन आरोपीची आई मनसेची पदाधिकारी आहे. अल्पवयीनसोबतचे अन्य आरोपी हे मनसेशी संबंधित असल्याचा संशय आहे. मनसेचे शहर अध्यक्ष हेमंत सावंत यांनी त्या घटनेशी संबंध नाकारला आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पा-नं-८८

# दीड महिन्यात मुंबईच्या चार पोलिसांचे ऑनड्युटी हार्टफेल

## कर्तव्याच्या अनिश्चित तासांमुळे वाढतोय ताण

ठाणे : पुढारी डेस्क

वातावरणातील बदल, राजकीय घडामोडीमुळे वारंवार राबवणारे बंदोबस्तांच्या परिणामामुळे गेल्या दीड महिन्यात मुंबई पोलीस दलातील ४ जणांचे ऑनड्युटी हार्टफेल झाले आहे. कर्तव्याच्या अनिश्चित तासांमुळे पोलीस कुटुंबियांवर दुखाचा डोंगर कोसळल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

सध्या राजकारण तपाले आहे. परिणामी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मुंबई पोलिसांना चोख बंदोबस्तासाठी दिवस-रात्र तैनात राहावे लागत आहे. त्यामुळे ८ तास कर्तव्याचा निर्णय केवळ कागदावरच राहिला असून याचा परिणाम पोलिसांच्या आरोग्यावर झाल्याचे वारंवार समोर येत आहे. गेल्या दीड महिन्याचा आढावा घेतला असता धक्कादायक माहिती समोर आली. हवालदार रामा महाले, सुजित पवार, थॉमस पिंटो, जीजा बन यांना अस्वस्थ वाटू लागल्याने त्वरित रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले. मात्र तपासणीअंती त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. एकामागो माग झालेल्या या घटनांमुळे पोलीस खात्यातील अनेकांनी शोक व्यक्त केला. या घटनांमुळे ८ तासांची कर्तव्य पुन्हा एकदा चर्चेत आले. तत्कालीन पोलीस आयुक्त दत्ता पडसलगीकर यांनी मुंबई पोलिसांचे कर्तव्य ८ तासांचे केले होते. कर्तव्याचे तास निश्चित झाल्याने पोलीस व त्यांच्या कुटुंबियांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

मोर्चे, रॅलीसह उत्सवादरम्यान बंदोबस्तासाठी '८ तास कर्तव्याचा' विशेष मास्टर प्लॅन पोलिसांसाठी राबवण्यात आला होता. मात्र कोविड संकट काळात ८ तासांचे कर्तव्य बंद करण्यात आले. बदलत्या परिस्थितीनुसार कोविडचे संकट काही अंशी कमी झाले, सर्वत्र अनलॉक झाले मात्र मुंबई पोलिसांचे ८ तासांचे कर्तव्य अद्यापही सुरू झालेले नाही.

### अनेक पोलीस दवागोळ्यांवर

वयोमानानुसार पोलीस खात्यातील अनेक जण आजच्या घडीला दवागोळ्या खालून कर्तव्यावर हजर राहत आहेत. मधुमेह, हृदयविकारासह अन्य आजारांनी त्रस्त असतानाही त्यांना बंदोबस्त, स्पेशल नाकाबंदीसह मोर्चा, सण-उत्सवावेळी तगडा बंदोबस्त राबवावा लागत आहे. त्यामुळे पोलिसांचे आरोग्याकरिता पुन्हा एकदा आठ तासांचे कर्तव्य सुरू करावे, अशी मागणी पोलीस कुटुंबियांकडून होऊ लागली आहे.

पुढारी पु-५त-३.

# सोसायटी आवारातील अनधिकृत बांधकाम तोडा

## अन्यथा तीव्र आंदोलन छेडू; वसई पालिका प्रशासनाला इशारा

नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा

नालासोपारा पश्चिमेकडील केसी कॉम्पलेक्स गृहसंकुलातील सोसायटी आवारातील अनधिकृत बांधकामांवर तोडक कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्या पूजा कांबळे यांनी नालासोपारा पोलीस व वसई विरार महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्तांकडे केली आहे. पालिकेने जर तोडक कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा कांबळे यांनी दिला आहे.

केसी कॉम्पलेक्स बिल्डिंगच्या आवारामध्ये भाडोत्री गाळेधारक भाडेकरू यांनी स्वमर्जीने सोसायटी सर्व नियम व अधिकार पायदळी तुडवून अनधिकृतपणे बांधकाम करून अंदाजे ५/६ फुट पुढे वाढवलेले आहे. सोसायटीच्या आवारामध्ये अत्यंत अस्वच्छता असून गटाराचे पाणी बाहेर येऊन दुर्गंधी येत आहे. सोसायटीच्या आवारामध्ये भाडोत्री गाळेधारक यांनी विक्री वाहने उभी केली असून जुनी वाहनेही रहिवाश्यांना ये-जा करण्यासाठी खुप त्रास होत आहे. भाडोत्री गाळेधारक दादागिरी व अरेरावीचे वर्तन करीत आहे. पालिकेने तोडक कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्त्या पूजा कांबळे यांनी दिला.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पु-पा-३.

# वसईकरांची रुग्णालयाअभावी कुचंबणा

## मंजूर खानिवडे ग्रामीण रुग्णालय रखडलेय; रुग्णांची फरपट

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

वसईच्या पूर्वेला असलेल्या ग्रामीण जनतेला अद्ययावत शासकीय रुग्णालय नसल्याने त्यांना खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागतोय.मंजूर झालेल्या खानिवडे येथील ग्रामीण रुग्णालयाला प्रशासकीय मान्यता मिळाली असली तरी अजूनही या रुग्णालयाच्या कामाला सुरुवात झाली नाही. त्यामुळे या रुग्णालयाचे काम रखडले आहे. यामुळे या भागातील रुग्णांना वसई, विरार, मुंबई, गुजरात येथे जाऊन उपचार घ्यावे लागत आहेत.

वसई पूर्वेच्या ग्रामीण भागातील नागरिक व महामार्गावरील अपघात ग्रस्त यांना तात्काळ उपचार मिळावे यासाठी. २०१४ साली खानिवडे येथे रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी निधीही मंजूर करण्यात आला आहे . तसेच यासाठी



०.९९ हेक्टर जागेची तरतूद करण्यात आली आहे . त्यात ०:१८ हेक्टर जागा ही वनविभागाची होती. त्यांचीही हस्तांतरण प्रक्रिया ही पार पडली आहे. त्यानंतर रुग्णालयाच्या मुख्य इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखड्याला शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. मात्र आता या प्रक्रियांना तब्बल दहा वर्षाचा कालावधी लोटला असला तरी रुग्णालयाचे बांधकाम सुरू जगले नाही .आणि जेव्हा सुरू होईल त्यानंतर बांधकाम पूर्ण होईपर्यंत आणि शुभारंभ होई पर्यंत या भागातील नागरिकांना अपघातग्रस्तांना आपले उपचार बाहेर जाऊनच करावे लागणार आहेत.

प्रस्तवित या रुग्णालयाच्या संपादित जागेला कुंपण घालण्यात आले असून या रुग्णालयासाठी १४ कोटी ८९ लाख ७३ हजार ९५९ रुपये इतका निधी खर्च केला जाणार आहे.

प्रशासकीय मान्यता मिळूनही पुढील प्रक्रिया पूर्ण न झाल्याने अजूनही रुग्णालयाचे काम सुरू झाले नाही. रुग्णालय तयार न झाल्याने आजही येथील नागरिकांना. शहराकडे उपचारासाठी धाव घ्यावी लागत आहे.

कामाची निविदा प्रक्रिया काढण्याचे काम सुरू आहे. ती पूर्ण झाल्यानंतर कामाला सुरवात होईल असे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले आहे. हे रुग्णालय महामार्गावर असल्याने अपघातानंतर तातडीच्या उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. हा भाग ग्रामीण असल्याने दुर्गम भागातील सर्प दंश, रेबीज, कीटक दंश यांच्यासह गंभीर आजारी रुग्णांना उपचारासाठी लागणार लांबचा प्रवास थांबणार आहे.

पुढारी पु-पा-१.

# विनापरवानगी झाडे कापल्याप्रकरणी कंपनीवर गुन्हा दाखल

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीतील मीरागाव येथे एका कंपनीने बेकायदेशीर, विनापरवानगी झाडे कापल्याप्रकरणी मीरा भाईंदर उद्यान विभागाने काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

मीरागाव येथील एम.आय.डी.सी. मिरा, प्लॉट नं. ए-१२ येथील मे. सी. आर. इंटरप्रायजेस या जागेतील ४ ते ५ मोठी झाडे कापल्याची तक्रार मीरा भाईंदर उद्यान विभागाचे उद्यान अधीक्षक नागेश विरकर यांच्याकडे करण्यात आली होती. त्या तक्रारीनुसार त्या ठिकाणी उद्यान विभागाकडून प्रत्यक्ष पाहणी केली असता त्या जागेतील २ ताडाची झाडे, १ रैन्ट्रीचे झाड व १ उंबराचे झाड जमिनी लगत कापलेले दिसून आले. तसेच २ रेंन्ट्रीच्या झाडांची छाटणी करण्यात आल्याचे दिसून आले. त्या कंपनीला नोटीस दिली असता कोणत्याही प्रकारचा खुलासा करण्यात आलेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ वृक्ष संरक्षण आणि संवर्धन नियम, ३००९ सह शासन आदेश, अधिसूचनाचे प्रकरण ५ कलम ८ (३) (क) या नियमाचे उल्लंघन केल्यामुळे मे. सी. आर. इंटरप्रायजेस या कंपनीवर बेकायदेशीरपणे झाडे कापलेली असल्यामुळे त्यांच्या विरुध्द काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

३४ वर्षांच्या अखंड
पत्रकारितेची परंपरा...

# दैनिक नरवीर चिमाजी

वर्ष : ३५ | अंक : २४२ | सोमवार दि. १० एप्रिल २०२३ | पाने : ४ | किंमत २ रुपये

# हत्या करून फरार आरोपींना सहा वर्षानंतर ठोकल्या बेड्या

## पुर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून केली हत्या

नालासोपारा : वार्ताहर


तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३६ वर्षीय एकाची हत्या करून सहा वर्षे फरार असणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश मिळाल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी विलास धावगुडे यांनी शनिवारी दिली आहे.

बिलालपाडा नाका येथे राहणारे सुनिल राजेश महाणी (३६) यांचे संतोष भवन येथे राहणारे दिवाकर राकेश सिंग यांच्यासोबत २१ ऑक्टोबर २०१८ साली गौराईपाडा येथे भांडण झाले होते. यांच्यात झालेल्या भांडणाचा मनात राग धरून २४ ऑक्टोबर २०१८ साली सुनील यांना लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण करून गंभीर जखमी करून जीवे ठार मारले होते. तुळींज पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपी दिवाकर राकेश सिंग याला त्यावेळी अटक केली होती. पोलीस ठाणे व तत्कालीन स्थानिक गुन्हे शाखा यांनी गुन्ह्यात पाहिजे आरोपी रमेशकुमार कोतवाल सिंग, सुधाकर राकेश सिंग यांचा शोध घेतुनही ते मिळून आले नव्हते. या हत्येच्या गुन्ह्यातील फरार आरोपींचा शोध ...पान ४ वर



### वसई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १३ जागासाठी ४० उमेदवार रिंगणात

# सत्तारुढ बविआ विरोधात प्रथमच विरोधकांचे पॅनल!



वसई : वार्ताहर

वसई कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक होत असून यामध्ये १३ जागांसाठी ४० उमेदवार निवडणुकीला उभे राहिले आहेत. २८ एप्रिल ला मतदान होणार आहे. आता पर्यंत बहुजन विकास आघाडीने येथील सत्ता एकहाती आपल्या हाती ठेवली होती. यावेळेला पहिल्यान्दाच भाजपच्या राजेंद्र म्हात्रे यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने बहुजन विकास आघाडीला आव्हान दिले आहे. या निवडणुकीपूर्वी चार जागा बिन विरोध आल्या असून त्यात ५ जागा बहुजन तर एक जागा विरोधी पॅनलला मिळाली आहे. ...पान ४ वर


# पोलिसांबाबत जनसामान्यांमध्ये आदरयुक्त भीती असावी-शरद पाटील



वाडा : वार्ताहर

जनसंपर्क अभियान अंतर्गत आयोजित

# सोडतीसाठी कमी अर्ज सादर झाल्याने १९ एप्रिलपर्यंत मुदतवाढ



विरार : वार्ताहर

बोळींजमधील सर्वात मोठ्या गृह प्रकल्पातील २०४८ घरे अनेकदा सोडतीत समाविष्ट करूनही विकली गेलेली नाहीत. म्हाडामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर

# आश्रम शाळेच्या मालमत्तेचा प्रश्न मार्गी लावणार – रवींद्र चव्हाण



पालघर : वार्ताहर

आश्रम शाळेच्या असणाऱ्या अडचणी व त्यांच्या मालमत्तेविषयी असलेल्या समस्या

चव्हाण बोलत होते. यावेळी खासदा पवार जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश खासदार राजेंद्र गावित सर्वश्री आमदार वळवी पाटील, सुनील भुसारा जिल्हाधिका

Scanned with CamScanner

# After absconding for 4 years, 2 people held in murder case

## To evade the police, the duo had assumed fake identities and settled in Uttar Pradesh

SURESH GOLANI
MIRA-BHAYANDAR

After evading the police dragnet for nearly four years, two men were held on Saturday by the central crime branch unit of the Mira Bhayandar-Vasai Virar police for their alleged involvement in the brutal murder of their 36-year-old acquaintance.

According to the police, the incident was reported on October 24, 2018 when the body of Sunil Rajesh Sahani, 36, was found near a pond in the Santosh Bhawan area of Nallasopara East.

His body was inflicted with deep head and other injuries apparently caused due to an assault with rods by the unidentified assailants.

An offence under sections 302 (murder) and 34 (common intention) of the Indian Penal Code was registered at the local police station. Preliminary investigations revealed that just three days before the murder, the deceased had been entangled in a brawl with Diwakar Rakesh Singh over a trivial issue.

To take revenge, Singh along with his relatives, Rameshkumar Kotwal Singh, 40, and Sudhakar Rakesh Singh, 20, mounted a brutal assault with bamboo sticks on Sunil which resulted in his death. The police arrested Diwakar but both his accomplices remained absconding.

The central crime branch team led by Inspector Rahul Raakh started parallel investigations into the case which revealed that the absconding duo had settled in Uttar Pradesh by assuming fake identities. The police activated their core informer network and got a tip-off that the duo would be visiting their relatives in Nallasopara.

Accordingly, the team laid a trap and apprehended the duo from the Bilalpada area. Both have been remanded to police custody.

Scanned with CamScanner

लोकमत

# बाइक बाजूला उभी करूनही मैत्रिणीशी बोलता येईल भावा!

## मोबाइलवर बोलत चालवतात वाहने : अपघाताची भीती

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** दुचाकी चालवताना वर्दळीच्या रस्त्यावर एका हातात मोबाइल व अन्य एका हाताने वाहन चालवण्याचे प्रकार शहरात अनेक ठिकाणी दिसून येतात. मात्र, अशा प्रकारे वाहन चालवून अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो. यात वाहतूक पोलिसांनी हटकले किंवा ई-चलनाद्वारे कारवाई केल्यास दंडसुद्धा भरावा लागू शकतो. मात्र, याकडे अनेक जण दुर्लक्ष करतात. मोबाइलवर बोलत वाहन चालवणे अनेकांच्या जिवावर बेतलेले आहे. याची काळजी प्रत्येकाने घेणे गरजेचे आहे.

वाहन चालविताना अनेक तरुण हे मित्रमैत्रिणींशी मोबाइलवर बोलतात. जिवाची पर्वा न करता विनकामाच्या गप्पा मारणाऱ्या तरुणांना सावधानतेचा इशारा वाहतूक पोलिस नेहमीच देतात. फोनवर बोलायचेच असेल किंवा तितके महत्त्वाचे असेल तर त्यासाठी रस्त्याच्या कडेला वाहन उभे करून मनसोक्त बोलावे. त्यामुळे आपले आणि रस्त्यावरून जाणाऱ्या इतरांचेदेखील प्राण वाचतील, असे वाहतूक विभागाने अनेकदा स्पष्ट केले आहे.





## असे आकारले जातात दंड

### पहिल्यांदा हजार, दुसऱ्यांदा दहा हजार

१ पहिल्यादा नियम मोडला तर एक हजार रुपयांचा दंड लावला जातो. मात्र, मोबाइलवर बोलत वाहन चालवताना दुसऱ्यांदा आढळून आल्यास थेट १० हजारांचा दंड लावला जातो. गेल्या वर्षभरात अनेकांवर अशा प्रकारे दंड आकारण्यात आला आहे.

### लाईट मोटार व्हेईकल, पहिल्यांदा दोन हजार

२ दुचाकी, तीन चाकी, मोटार व्हेईकल आणि अन्य वाहने अशा कोणत्याही प्रकारामध्ये वाहन चालविताना मोबाइलचा वापर केल्यास पहिल्यादा नियम मोडल्यास एक हजार रुपयांचा दंड लावला जातो आणि हाच नियम दुसऱ्यांदा मोडल्यास थेट १० हजारांचा दंड होतो.

### इतर वाहने, पहिल्यांदा चार हजार, नंतर १० हजार

३ जड वाहने, ट्रक, टिप्पर अशी वाहने चालविताना मोबाइलवर बोलताना आढळल्यास पहिल्यांदा चार हजार तर दुसऱ्यांदा १० हजार दंड आकारण्यात येतो. गेल्या वर्षभरात शहर वाहतूक शाखेने अनेकांवर दंडात्मक कारवाई केली.

### तीन महिन्यांत २२१ जणांना दंड

वसई आणि विरार वाहतूक पोलिसांनी जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांच्या कालावधीत २२१ जणांकडून ३ लाख ११ हजार रुपये दंड आकारला आहे.

" वाहन चालवताना मोबाइलवर नाही बोलले, तर कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत नाही. जिवापेक्षा काहीही महत्त्वाचे नाही. त्यामुळे वाहन चालवताना मोबाइलवर बोलू नये. अत्यंत महत्त्वाचे असेल तर वाहन रस्त्याच्या बाजूला थांबवून बोलणे शक्य आहे. - सागर इंगोले, पोलिस निरीक्षक, वसई परिमंडळ २, वाहतूक विभाग

## कोणी मैत्रिणीशी बोलतं तर कोणी आईशी

### मैत्रिणीशी बोलत होतो

कामातून आता आपल्याला वेळ मिळाल्याने प्रवासपण होईल आणि मैत्रिणीसोबत गप्पाही मारता येतील म्हणून मैत्रिणीशी बोलत होतो, असे एका तरुणाने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

### वेळ मिळेल तेव्हा बोलतो

आपण आपले काम करतो; पण मित्र मैत्रिणींना वेळ दिला नाही, तर ते वेळ नाही, दूर गेला असे म्हणतात. कधी वेळ मिळेल तेव्हा मित्रमैत्रिणींशी बोलतो, परंतु माझे वाहन हळुवार असल्याचे तरुणाने सांगितले.

### घरच्यांशी बोलत होतो

मी माझ्या घरी आईसोबत आणि बहिणीसोबत कामानिमित्त बोलत होतो. घाई असल्यामुळे मी मोबाइलवर बोलत असल्याचे सिवीक सेंटर येथील चौकात मोबाइलवर बोलणाऱ्या तरुणाने सांगितले.



Scanned with CamScanner

# Police aspirant booked for fleeing with exam papers

SURESH GOLANI / Mira-Bhayandar

The Bhayandar police have booked a 24-year-old aspirant on charges of fleeing with the answer sheets during the written examinations for the ongoing recruitment drive to fill various posts in the state police force.

According to the police, an aspiring constable, who has been identified as Rahul Arjun Jagtap, had appeared for the written examinations held at the Netaji Subhash Chandra Bose Municipal Stadium in Bhayandar (west) last week. After the examinations ended, Jagtap instead of handing over the answer sheet to the supervisor, allegedly took advantage of the crowd and fled.

The supervisor, API Nitin Choudhary, alerted his seniors about the incident and registered a complaint at the Bhayandar police station.

"Jagtap, a resident of Pimpri Bu-Prade in Chalisgaon district, was booked under section 403 (dishonest misappropriation of property) and 406 (criminal breach of trust) of the IPC. He was issued a notice and allowed to go," said a police official.

It is suspected that Jagtap apparently wanted to cheat by taking along the blank answer sheets and return them after writing answers by claiming that he had taken away the papers by mistake.

**2,218 out of the 12,127 eligible candidates remained absent for the written examinations in the mega police recruitment drive**

Meanwhile, out of the 12,127 eligible candidates, including 8,858 male and 3,269 female, only 9,999 (7721 male and 2278 female) registered their presence for the examinations, while 2,218 remained absent. The process to recruit a total of 996 personnel including police constables and police constable drivers for the MBVV police commissionerate. While a total of 73,221 applications have been received for the police constable's job, 1,237 applicants including 1,196 male and 41 female aspirants are in fray for the constable driver posts.

Scanned with CamScanner

लोकमत

# गांजा सेवन, गुन्हा दाखल

नालासोपारा : विरार येथे गांजा सेवन केल्याप्रकरणी दोन जणांविरोधात अर्नाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहेत. ग्लोबल सिटी येथील के अवेन्यू येथे शनिवारी रात्री साडेदहाच्या सुमारास सरफराज रफिक सय्यद व धीरज दुर्योधन सावळे हे दोघे जण गांजा या अमली पदार्थाचे सेवन करताना रंगेहाथ सापडून आले होते. रविवारी अर्नाळा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 3 Apr 11, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# विरार के फर्जी कॉल सेंटर पर छापा, 53 अरेस्ट

■ **निसं, विरारः** अर्नाला पुलिस ने शनिवार रात राजोडी समुद्र किनारे एक रिसॉर्ट में चल रहे फर्जी कॉल सेंटर पर छापा मार कर 53 लोगों को गिरफ्तार किया है। पुलिस ने बताया कि आरोपियों ने एक ऑस्ट्रेलियन बैंक के साथ धोखाधड़ी की है।

**ऑस्ट्रेलिया बैंक के साथ धोखाधड़ी का आरोप**

अर्नाला पुलिस को शनिवार रात गुप्त सूचना मिली कि राजोडी समुद्र किनारे स्थित एक रिसॉर्ट में फर्जी कॉल सेंटर चल रहा है, जिसके बाद देर रात पुलिस ने रिसॉर्ट पर छापेमारी कर 53 लोगों को गिरफ्तार कर पूछताछ की, तो पता चला कि ये लोग ऑस्ट्रेलिया के पे पाल बैंक के ग्राहकों के साथ धोखाधड़ी करते थे।

पुलिस ने कॉल सेंटर से लगभग 20 लाख का माल बरामद किया है। गिरफ्तार आरोपियों में 13 लड़कियां शामिल हैं, जो पंजाब, दिल्ली और हरियाणा की रहने वाली हैं। डीसीपी सुहास बावचे ने बताया कि यह बड़ी कार्रवाई है और अभी जांच जारी है।

Scanned with CamScanner